**मे. एस पी शूगर अँड अग्रो प्रा. लि., मु. पोस्ट घाटसावळी, ता. जि. बीड या प्रस्तावित नविन प्रकल्पामध्ये ५००० टन प्रतिदिन साखर कारखाना तसेच २० मेगावॅट क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प आणि ३०० केएलपीडी क्षमतेचा मोलॅसिस/केन ज्यूस वर आधारीत आसवणी प्रकल्पाचे उत्पादन करणे बाबत दिनांक २९/०८/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता मे. एस पी शूगर अँड अग्रो प्रा. लि., मु. पोस्ट घाटसावळी, ता. जि. बीड येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त :-**

---

मे. एस पी शूगर अँड अग्रो प्रा. लि., मु. पोस्ट घाटसावळी, ता. जि. बीड या प्रस्तावित नविन प्रकल्पामध्ये ५००० टन प्रतिदिन साखर कारखाना तसेच २० मेगावॅट क्षमतेचा वीज निर्मिती प्रकल्प आणि ३०० केएलपीडी क्षमतेचा मोलॅसिस/केन ज्यूस वर आधारीत आसवणी प्रकल्पाचे उत्पादन करणे बाबत दिनांक २९/०८/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता मे. एस पी शूगर अँड अग्रो प्रा. लि., मु. पोस्ट घाटसावळी, ता. जि. बीड येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५९/ २०२२ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २२०८१२- एफटीएस-००२७ दि. १२/०८/२०२२ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्री. संतोष राऊत,**<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, बीड. | : | अध्यक्ष |
| २. | **श्री. सो. म. कुरमूडे,**<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, जालना. | : | समन्वयक |

डॉ. योगिनी बाळंखे, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. एस पी शूगर अँड अग्रो प्रा. लि., मु. पोस्ट घाटसावळी, ता. जि. बीड यांच्या प्रस्तावित नविन प्रकल्पामध्ये ५००० टन प्रतिदिन साखर कारखाना तसेच २० मेगावॅट क्षमतेचा वीज निर्मिती प्रकल्प आणि ३०० केएलपीडी क्षमतेचा मोलॅसिस/केन ज्यूस वर आधारीत आसवणी प्रकल्पाचे उत्पादन करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात येत आहे. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'अ' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. एस पी शूगर अँड अग्रो प्रा. लि. यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. २०/०७/२०२२ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने आजची

लोकसूनावणी दिं. २९/०८/२०२२ वेळ-सकाळी ११.०० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. २९/०७/२०२२ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
२. जिल्हा परिषद, बीड.
३. जिल्हा उद्योग केंद्र, बीड.
४. तहसिल कार्यालय, बीड.
५. ग्रामपंचायत कार्यालय, घाटसावळी, मन्यारवाडी, घाट जवळा, ढेकनमोहा, मौज, मांकुरवाडी, बाकरवाडी, ता.जि. बीड.
६. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे श्री. सूनंदा रेडडी, यांच्याकडून ईमेलद्वारे दिं. २८/०८/२०२२ रोजी सूचना प्राप्त झालेली आहे. प्रत सोबत जोडण्यात येत आहे. तरी उपस्थित नागरिकांमंधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात. त्यानंतर त्यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

प्रकल्पाचे प्रतिनिधी डॉ. संग्राम घोगरे, प्रकल्प सल्लागार, मे. ईक्वीनोक्स इंडिया प्रा. लि., कोल्हापूर यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने

अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. सो. म. कुरमूडे, यांनी उपस्थित सहभागींना विनंती केली की, सदर प्रकल्पासंबंधी जर कुणाला काही प्रश्न, सुचना, टिप्पणी, विचार इ. मांडायचे असतील तर ते त्यांनी त्यांचे नांव व गावाचे नांव सांगून विचारावेत.

जाहीर लोकसूनावणी दरम्यान उपस्थित सहभागींनी सदर प्रकल्पा संबधी काही प्रश्न उपस्थित केले त्याबाबतची प्रकल्प प्रतिनिधी कडून उत्तर देण्यात आले ते खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव. | उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर. |
|---|---|---|
| १. | श्री. धनंजय मूंडेकर, रा. आंबेसावळी, यांनी प्रकल्पास सहमती दर्शवून खालील प्रमाणे मूद्ये उपस्थित केले तसेच यांनी ग्रामपंचायत घाटसावळी मार्फत लेखीस्वरूपात निवेदन सादर केले (प्रत सोबत जोडण्यात येत आहे)-<br>१. सदरच्या प्रकल्पाचे सर्वे करत असताना आंबेसावळी गाव हे प्रकल्पापासून ७०० मी. च्या अंतरावर असताना देखील सर्वेमध्ये घेण्यात आलेले नाही.<br>२. सदरच्या सर्वेमध्ये वनविभागाच्या जमिनीबाबत नमूद केलेले नाही.<br>३. हवा प्रदूषणानाबाबत माहिती देते वेळेस So2 व Nox बाबत माहिती दिलेली नाही.<br>४. ETP व STP बाबत माहिती व तसेच प्रक्रियाकृत सांडपाण्याची विल्हेवाटी बाबत माहिती देण्यात यावी.<br>५. आंबेसावळी गावाच्या बाजूस वाहनारा ओढा हा पूढे मनकर्निका नदीमध्ये जातो याबाबत माहिती दिलेली नाही.<br>६. आंबेसावळी गावातील मातीचे परिक्षण सर्वे दरम्यान करण्यात आलेले नाही. | डॉ. संग्राम घोगरे, प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की, सदरच्या भागातील सर्वेदरम्यान ऋतू प्रमाणे हवेच्या दिशेनूसार गावाची निवड अभ्यासासाठी करण्यात आलेली आहे व तसेच प्राथमिक स्वरूपाचा डाटा तयार करण्यात आलेला आहे. तसेच दर ६ महिन्याला याबाबतचा अहवाल तयार करणे आवश्यक आहे त्यावेळेस सदरचे गाव सर्वेमध्ये समाविष्ट करण्यात येईल.<br>सदरच्या भागामध्ये वनक्षेत्र नाही असे म्हणता येणार नाही परंतू राखीव वनक्षेत्र, संरक्षित वनक्षेत्र व सामाजिक वनीकरण हे वनाचे प्रकार असून अशा प्रकारचे शासनाने अधिसूचित केलेले वनक्षेत्र या परिसरात नाही.<br>सदरच्या प्रकल्पाच्या चिमणीची उंची ७२ मी. इतकी असणार आहे तसेच हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणे मध्ये ESP बसविण्यात येणार असून त्यामूळे परिसरामध्ये हवा प्रदूषणाचा त्रास संभावणार नाही.<br>तसेच घरगूती सांडपण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अद्यावत STP ची यंत्रणा उभारण्यात येत असून औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अद्यावत ETP ची यंत्रणा उभारण्यात येणार आहे. व प्रक्रियाकृत सांडपाणी हे उद्योगाच्या परिसामध्येच वृक्षलागवडीसाठी वापरण्यात येणार आहे. तसेच आसवणी प्रकल्पा हा Zero Liquid Discharged (ZLD) या तत्वावर उभारण्यात येणार असून सांडपण्याचा एकही थेंब प्रकल्पाच्या बाहेर जाणार नाही. तसेच याबाबत सर्व तांत्रीक बाबी प्रकल्प |

| | | |
|---|---|---|
| | | सल्लागाराने उपस्थितांना सविस्तर समजून सांगितल्या. |
| २. | श्री. प्रकाश ठाकूर, सरंपच ढेकनमोहा ग्रामपंचायत, यांनी सदरच्या प्रकल्पास सहमती दर्शवून कारखान्यांमूळे परिसरामध्ये दूर्गंधी पसरण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला. | डॉ. संग्राम घोगरे, प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की, सदरचा प्रकल्प अत्याधूनिक तंत्रज्ञानावर उभारण्यात येत असून आसवणी प्रकल्पातून निघणारे Spent wash बंद टाकी मध्ये जमा करून Biomethenisation नंतर Dryer मध्ये प्रक्रिया करून पावडर बनविण्यात येईल त्यामूळे परिसरामध्ये दूर्गंधीचा त्रास होणार नाही. |
| ३. | श्री. चंद्रकांत शिवाजी फड, घाटसावी, यांनी सदरच्या सहमती दर्शवून खालील प्रमाणे मूद्दे उपस्थित केले-<br>१. आद्योगिक सांडपाण्याच्या विल्हेवाटी मूळे परिसरातील जल प्रदूषित होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.<br>२. उद्योगामूळे परिसारातील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.<br>३. सीएसआर फंडामधून परिसरातील गायरान जमिनीवर Dense Forest करण्यात यावे तसेच विध्याथयासाठी परिसरात क्रिंडागंन व इतर योजना प्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात याव्यात.<br>४. तसेच प्रकल्पाच्या परिसरामधून जाणारा स्थानिक रस्ता नागरिकांच्या वहीवाटीसाठी मोकळा करून देण्यात यावा. | डॉ. संग्राम घोगरे, प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की, घरगूती सांडपण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अद्यावत STP ची यंत्रणा उभारण्यात येत असून औद्योगिक सांडपण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अद्यावत ETP ची यंत्रणा उभारण्यात येणार आहे. व प्रक्रियाकृत सांडपाणी हे उद्योगाच्या परिसामध्येच वृक्षलागवडीसाठी वापरण्यात येणार आहे. तसेच आसवणी प्रकल्प हा Zero Liquid Discharged (ZLD) या तत्वावर उभारण्यात येणार असून सांडपण्याचा एकही थेंब प्रकल्पाच्या बाहेर जाणार नाही.<br>कारखान्याचे चेअरमेन श्री. सूरेश पाटील यांनी सांगितले की, सीएसआर फंड हा मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्गदर्शनाखाली खर्च करण्यात येईल त्यामूळे परिसरातील विवीध प्रकल्प चांगल्या प्रकारे राबविण्यात येतील असे आश्वाशित केले.<br>तसेच स्थानिक रस्त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास वेगळे निवेदन देणेबाबत समितीचे अध्यक्षांनी सूचित केले. |
| ४. | श्री. अरूण मूरलीधर लांडे, घाटसावळी, यांनी प्रकल्प उभारणीस सहमती दर्शक मूद्दे प्रस्तूत करून सादरीकरणामध्ये नमूद केलेल्या उपाययोजना बाबत काटेकोरपणे पालन करावे असे नमूद केले. | डॉ. संग्राम घोगरे, प्रकल्प सल्लागार यांनी याबाबत सहमती दर्शवली. |

| | | |
|---|---|---|
| ५. | श्री. प्रल्हाद लांडे, घाटसावळी, यांनी प्रकल्पाला सहमती दर्शहून सांगितले की, त्यांचे शेत या प्रकल्पाला लागूनच आहे तसेच त्यांनी विनंती केली की, पांदन रस्ता स्थानिक वहीवाटीसाठी मोकळा करून देण्यात यावा. | कारखान्याचे चेअरमन श्री. सूरेश पाटील यांनी याबाबत सहमतीने प्रश्न सोडविण्यात येईल असे सूचविले. |
| ६. | श्री. सूनंदा रेडडी, यांनी प्रकल्पाचे अभिनंदन करून प्रकल्पास सहमती दर्शवनारे पत्र सादर केले. | श्री. सो.म. कुरमुडे, समिती समन्वयक यांनी लिखीत स्वरूपातील सूचनांचे पत्र स्विकारले व याबाबत नोंद करण्यात आलेली आहे असे कळविले. |

श्री. सो.म. कुरमुडे, यांनी उपस्थितांना विचारले की, अजुनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना/टीप्पणी नव्हती.

श्री. सो. म. कुरमूडे यांनी जाहीर लोकसूनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

**सो. म. कुरमुडे**
(समन्वयक)
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जालना.

**संतोष राऊत**
(अध्यक्ष)
तथा
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी बीड.

**MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING FOR PROPOSED ESTABLISHMENT OF NEW PROJECT OF 5,000 TCD SUGAR FACTORY, 20 MW CO-GENERATION PLANT & 300 KLPD MOLASSES/SUGAR CANE JUICE BASED DISTILLERY PROJECT LOCATED AT POST GHATSAWALI, TALUKA & DISTRICT-BEED, MAHARASHTRA BY PROJECT PROPONENT M/S S.P. SUGAR & AGRO PRIVATE LIMITED, AT POST GHATSAWALI, TALUKA & DISTRICT BEED, MAHARASHTRA.**

---

The Environment Public Hearing Meeting for the proposed establishment of new project of 5000 TCD Sugar Factory, 20 MW Co-Generation Plant & 300 KLPD Molasses/Sugar Cane Juice Based Distillery Project located At Post Ghatsawali, Taluka & District Beed, Maharashtra by the Project Proponent M/s. S. P. Sugar & Agro Private Limited, At Post Ghatsawali, Taluka & District – Beed, Maharashtra was conducted on 29-08-2022 at 11.00 am at the project site.

As per Board's Office Order No. E- 59 of 2022 under letter no. BO/JD (WPC)/PH/B - 220812- FTS- 0027 dated 12-08-2022. Panel for Public Hearing was formed. Following Panel members were present during the public hearing:

Following Panel members were present during the public hearing:

1. **Shri. Santosh Raut,**
   Additional District Magistrate, Beed,
   Dist: Beed. — Chairman.

2. **Shri. S.M. Kurmude,**
   Sub-Regional Officer,
   M.P.C. Board, Jalna. — Convener.

Dr. Yogini Balankhe, Field Officer, Sub Regional Office, MPCB, Jalna welcome the Hon'ble Chairman of the Public Hearing Panel, officials, public representatives and public who are present and with the permission of the Chairman of the Public Hearing Committee he gave information in brief about Public Hearing on Environment.

Dr. Yogini Balankhe, informed that, as per the EIA Notification of Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (i.e. MoEFCC, GoI) dated 14th September, 2006 as amended on 1st December, 2009, it is mandatory to conduct prior public hearing to certain projects which are covered in the Schedule of the said Notification and this unit comes under the purview of this Notification. The Project Proponent has submitted an application to the Maharashtra Pollution Control Board on 20-07-2022. The public hearing was scheduled on 29-08-2022 time 11.00 a.m. with approval of Hon'ble District Collector Beed. Accordingly notice was published in Daily Times of India (English) & Daily Sakal (Marathi) on dated 29-07-2022. Also the documents pertaining to the summary of the Environmental

Assessment Report on the project (in English and Marathi) was made available for study to the interested public in the respective Gram Panchayat offices and other government offices. Accordingly, today's public hearing is being held. A copy of EIA report and executive summery was made available at various Govt. offices as under-

1) District Collector, Beed.
2) Zilha Parishad, Beed.
3) District Industries Centre, Beed.
4) Tahsildar, Tahsil Office, Beed.
5) Grampanchayat Office, Ghatsawali, Manyarwadi, Ghat Jawala, Dhekan Moha, Mauj, Mankurwadi, Bakarwadi, Tal. Dist. Beed.
6) Sub-Regional Office, Maharashtra Pollution Control Board, Jalna.
7) Regional Officer, Maharashtra MPCB, Plot No. A-4/1, MIDC Chikalthana Aurangabad.
8) Maharashtra Pollution Control Board, Kalpataru Point, 2nd,3rd & 4th Floor, Sion Matunga Scheme Road No. 8, Sion (E), Mumbai – 400 022.
9) Environment Department, Government of Maharashtra, Mantralaya, Mumbai-32.
10) Regional Office, Ministry Environment, Forest & Climate Change, (WCZ),Ground Floor, East Wing, New Secretariat Building, Civil Lines, Nagpur.

Further she clarified that, Board had given 30 days period for submission of any suggestions/Objections/views etc about the project as per the notifications and Sub-Regional Office, M.P.C. Board Jalna has received 1 comments on the project by Email dated 28-08-2022 from Shri. Sunanda Reddy (Copy enclosed). Also she informed to the public that, participants can raise their objections, comments etc. in oral or written. The objections and comments should be on environment point of view only. The Convener requested project proponent to give presentation on the proposed project.

The Representative Dr. Sangram Ghogare of M/s. Equinox India Pvt. Ltd., Kolhapur has given information in brief along with presentation on various environmental aspects i.e. Environment Impact Assessment and intention behind arranging the Public Hearing, Details about the Project, Project Plan, Environment Status, Details of local Environment and surrounding environment information, Locations of the study area, Air quality in the study area, Noise levels in the study area, Water quality in the study area, Soil quality in the study area, Bio-diversity, Socio-Economic Environment, Expected impact on the surrounding area, Environment Management Plan, Remedial measures on the various environmental impacts, Social Economic Development Plan, Budgetary provisions for environmental management, Net gain from the project etc. The information on the above is recorded in the CD and taken notes in brief in the minutes of the public hearing.

After concluding the power point presentation of said project by the Project Consultant, Shri. S.M. Kurmude, requested the public participants that if anybody would like to express any suggestions, notes, thoughts, questions, etc. related with the said project same may be asked by telling their name and village name.

During the course of public hearing, the public participants raised certain questions related with the said project and answered the same are as below:-

| Sr. No. | Name and address of the person along with suggestions, views, comments etc., | Reply given by project proponent / Consultant |
|---|---|---|
| 1. | Shri. Dhananjay Mundekar, at. Ambesawli, Expressed support to the project but some point were raised as under also submitted a written presentation through GramPanchayat ambesawli (copy is enclosed)-<br>1. While surveying the said project, Ambesavali village which is 700 mtr from the project site was not considered.<br>2. Forest Department land is not mentioned in the said survey.<br>3. Information about air pollution is given but information about So2 and Nox is not mentioned.<br>4. Information about ETP and STP and also about disposal of treated effluent should be given.<br>5. No information has been given about local nala flowing near by village ultimately meeting to Mankarnika river.<br>6. Soil testing in Ambesawli village was not carried out during the survey. | Dr. Sangram Ghogare, Project Consultant replied that, during the survey of the said area, the villages are been selected for the study according to the wind direction as per the season and the preliminary data has been prepared. It is necessary to prepare a report in this regards every 6 months at that time the said village will be included in the survey.<br>It cannot be said that there is no forest in said area but reserved forest area, restricted forest area and social forestry are types of forest and there is no such type of forest area notified by the government in this area.<br>The height of the chimney of the said project is 72 mtr. And Air pollution control system comprises of ESP and due to this there will be no problem of air pollution in the area.<br>Also, updated STP will be provided for treatment of domestic sewage and updated ETP will be set up for treatment industrial effluent and treated effluent will be used irrigation within the premises of the industry. Also, the distillery project will be set up on the principle of Zero Liquid Discharged (ZLD) and not a single drop of effluent will go outside the project. Also, the project consultant explained all the technical aspects in detail to the present public in the matter. |
| 2. | Shri. Prakash Thakur, Sarpanch Dhekanmoha Gram Panchayat, While supporting to the project, has raised the question about the smell nuisance due to the process in the area. | Dr. Sangram Ghogare, Project Consultant replied that, the said project is being built on advance technology and the spent wash from the distillation plant will be collected in a closed tank and after Biomethanisation it will be processed in a dryer to make powder, so there will be no problem of smell in the area. |

| | | |
|---|---|---|
| 3. | Shri. Chandrakant Shivaji Phad, Ghatsavli, supported to the above project but raised the following points-<br>1. Care should be taken to ensure that the water in the area will be not be polluted due to the disposal of industrial effluent.<br>2. Care should be taken that the industry does not affect the health of the citizens in the area.<br>3. By using CSR funds dense Forest shall be develop on the govt. land in the area. Also play ground and other such activities shall be carried out by using CSR funds.<br>4. Also, the local road passing through the project area shall be cleared for the villagers. | Dr. Sangram Ghogare, Project Consultant replied that, an updated STP will be provided for treatment of domestic sewage and updated ETP will be set up for treatment industrial effluent and treated effluent will be used irrigation within the premises of the industry. Also, the distillery project will be set up on the principle of Zero Liquid Discharged (ZLD) and not a single drop of effluent will go outside the project.<br>Chairman of the industry Shri. Suresh Patil said that, the CSR Fund will be utilized with guidance of District Collector Beed. He also assured that various social projects in the area will be developed.<br>Also, the chairman of the committee informed that, separate presentation shall be submitted to the collector office Beed regarding the local road. |
| 4. | Shri. Arun Murlidhar Lande, at. Ghatsawli, supported to the above project and mentioned that, the precaution in the presentation shall be strictly followed. | Dr. Sangram Ghogre, Project Consultant, agreed to this. |
| 5. | Shri. Prahlad Lande, at. Ghatsawli, supported to the project and saying that, his farm is adjacent to the project and requested that the Pandan Road be cleared for local villagers. | Chairman of the industry Shri. Suresh Patil suggested that the issue will be resolved by consensus. |
| 6. | Shri. Sunanda Reddy, congratulated the project and presented a letter for suggestions to the project. | Shri. S.M. Kurmude, Committee Convener accepted the letter of instructions in written and informed that a record has been taken in this regard. |

Shri S.M. Kurmude again requested the public participants that if anybody is still having any question, same may be asked, but after observing that no questions are remained to ask by anybody.

Shri S.M. Kurmude thanked the public participants and with the permission of the Chairman of the Public Hearing Committee concluded the public hearing on the proposed project.

Lastly, the Public Hearing ended with a vote of thanks to the **Chair**.

**(S.M. Kurmude)**
Convener
And
Sub-Regional Officer,
MPCB, Jalna

**(Santosh Raut)**
Chairman
And
Additional District Magistrate, Beed